**International Journal of Advance and Applied Research**
**www.ijaar.co.in**
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.10 No.6** **July-Aug 2023**

# राजर्षी शाहू महाराज आणि लोकमान्य टिळक यांची वेदोक्त प्रकरणातील भूमिका

**डॉ. अशोक बाबुराव जाधव**
राज्यशास्त्र विभाग शहाजीराजे महाविद्यालयं,खटव, जि.सातारा
**Corresponding Author- डॉ. अशोक बाबुराव जाधव**
**DOI-10.5281/zenodo.8344492**

**प्रस्तावना –**

वेदोक्त प्रकरण हे छत्रपती शाहू महाराजांपूरते नव्हते, तर बहुजनांच्या धार्मिक, सामाजिक,राजकीय, आर्थिक जडणघडणीच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. छत्रपती शाहू महाराजांनी वर्णव्यवस्थेने दिलेले वेदोक्ताचे अधिकार मिळवण्यासाठी ब्राह्मणांच्या मक्तेदारीला आव्हान देवून जातीभेद आणि वर्णभेद नष्ट करण्यासाठी लढा दिला. या प्रकरणात लोकमान्य टिळकांची प्रतिमा महाराष्ट्रातील सनातनवाद्यांचे पुढारी किवा धर्मरक्षक अशी होती हे प्रकरण चिघळण्यास लोकमान्य टिळक कारणीभूत होते.

**विषयाचे महत्व –**

वेदोक्त प्रकरण हा विषय समाजाच्या धार्मिक सुधारणांच्या बाबतीत महत्वाचा आहे. एक राजा असताना तसेच शिवाजी महाराजांचे वंशज असताना छत्रपती शाहू महाराजांना क्षत्रिय असण्याचा अधिकार ब्राह्मणवृंदाने नाकारला, यावरुन सर्वसामान्य जनतेचे शोषण किती भयानक असेल याची कल्पना आपल्याला येईल. वेदोक्त प्रकरण हे धार्मिक, सामाजिक,राजकीय दृष्टीने महत्त्वाचे आहे. आजच्या काळात धार्मिक सुधारणा गरजेच्या आहेत. आजही धार्मिक रूढी,परंपरा समाजात दिसून येतात. वेदोक्त प्रकरणामुळे कितीतरी बदल आजच्या काळात झालेले आहेत. धार्मिक स्वातंत्र्य ब्राह्मणेत्तरांना मिळू लागले. आज विवाह लावणे, विवाहात मंगलाष्टका म्हणणे,शाहू वैदिक विद्यालय मधून वैदिक शिक्षण घेऊन आज लष्करामध्ये पंडित म्हणून अनेकजन भरती झाले आहेत, कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिर असो,पंढरपूरचे विठ्ठल मंदिर असो किंवा प्रतापगडचे भवानी मंदिर असो,याठिकाणी पुरोहिताचे शिक्षण घेतले त्यांना नोकऱ्या मिळाल्या आहेत. फार मोठा उपक्रम शाहू महाराजांनी 100 वर्षापूर्वी सुरू केला होता,आणि धार्मिक रूढी,परंपरा राहणार,समाजाला धर्माची गरज असते. किमान त्या धार्मिक रूढी,परंपरा पाळण्याचा अधिकार प्रत्येकाला पाहिजे आणि त्यामुळे कोणीही पूरोहित होऊ शकते हे शाहू महाराजांनी त्यावेळी दाखवून दिले आणि त्यामुळे आज कोणीही पूरोहित होऊ शकते. आज देवळातील पुजारी ब्राह्मणेत्तर होऊ लागले. ज्याचा अभ्यास आहे ते कोणीही होऊ शकते. जन्मावर आधारित जो अधिकार होता तो आज नाही. यातून बऱ्याच लोकांचे परिवर्तन झाले. धार्मिक अधिकार सर्वांना आहे हे आज भारतीय घटनेने मान्य केलेले आहे. आज धार्मिक स्वातंत्र्य ब्राह्मणेत्तरांना मिळू लागले. परंतु आजूनही त्यांची पकड कमी झालेली नाही. धार्मिक रूढी,परंपरा आहेत. उच्च वर्णीयांचे श्रेष्ठत्व मान्य करणारे लोक आजही आहेत. त्यांची मानसिकता गेलेली नाही. सत्यनारायण पूजा, होम, गृहप्रवेश, नारायण नागबळीसारख्या विधिमधून पुरोहिताकडून अमाप पैसे घेऊन विधी केले जातात.तसेच पूणे येथील खोले प्रकरण अशी उदाहरणे देता येतील. वेदोक्त प्रकरणानंतर बदल झाले पण हे दिसतय. आज स्वातंत्र्यानंतर ही व्यवस्था बदलणारे राजकीय नेतृत्व मिळाले नाही. आजच्या आस्मितानिष्ठ राजकरणात याच्या निर्मूलनाची शक्यता मला दिसत नाही. म्हणून हा विषय मला महत्वाचा वाटत आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये –**

1) वेदोक्त प्रकरणासंदर्भात राजर्षी शाहू महाराजांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
2) महाराष्ट्राच्या राजकारणातील ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वादाचा अभ्यास करणे.
3) वेदोक्त प्रकरणासंदर्भात लोकमान्य टिळकांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
4) आजच्या काळातील धार्मिक विधीचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहीतके -**

1) बहुजनांच्या चळवळीचे नेतृत्व शाहू महाराजांनी केले.
2) महाराष्ट्राच्या राजकरणाला ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वादाची कायमची चौकट मिळाली.
3) वेदोक्त प्रकरणात लोकमान्य टिळकांनी ब्राह्मण वर्गाची बाजू उचलून धरली.
4) आजच्या काळात धार्मिक विधी ब्राह्मण वर्गांकडून केले जात असले तरी काही ब्राह्मणेत्तर लोकांकडून धार्मिक विधी होत आहेत.

**संशोधन पध्दती –**

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक व संदर्भ अन्वेषण पध्दतीचा आधार घेण्यात आला.

**तथ्य संकलन –**

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी दुय्यम साधनांचा वापर केला असून यामध्ये शाहू छत्रपती आणि लोकमान्य टिळक यांच्यावरील ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, मासिके, इंटरनेट, इत्यादींचा वापर केला आहे.

**वेदोक्त म्हणजे काय?**

धार्मिक संस्कारात वेडतील मंत्रांना अत्यंत महत्व आहे.'हिंदू धर्मातील सोळा संस्कार व इतर धर्मकृत्ये वैदिक मंत्रानी करण्याचा अधिकार म्हणजे वेदोक्त'.[1] धर्मशास्त्राप्रमाणे दोन पद्धतीने धार्मिक विधी केले जातात. यामध्ये वेदोक्त म्हणजे वेदामध्ये म्हटलेले,पुराणोक्त म्हणजे पुरणामध्ये सांगितलेले. वेद हे आद्य. त्यानंतर पुराणे आली. त्यात धर्मशास्त्रे आली. आज ज्याला आपण हिंदू धर्म म्हणतो हा बहुतांशी पुराणोक्त आहे. ज्या पुराणामध्ये अनेक कथा,कल्पित कथा, भाकड कथा अशा कथांमध्ये पुराणे सजली गेली आणि त्याच्यावर हा धर्म उभारला गेला.

**उपनयनविधी –**

उप म्हणजे जवळ आणि नयन म्हणजे जाणे. ज्या संस्कारने विद्यार्थ्याला गुरुच्या जवळ घेऊन जाण्यात येते त्याला उपनयन संस्कार म्हणतात. सर्व 16 संस्कारात उपनयन संस्कार श्रेष्ठ मानला जातो.(16 संस्कारमध्ये गर्भधान, नामकरण, जातकर्म, विवाह इ.)उपनयनविधीचे अधिकार असणाऱ्या वर्गाचे विधी वेदोक्त पद्धतीने केले जात. वेद हे ईश्वर निर्मित अशी धार्मिक मान्यता आहे. वाई येथून निघणाऱ्या 'धर्म' नावच्या साप्ताहिकाचे संपादक भाऊशास्त्री लेले यांच्या मते, 'कलियुगात ब्राह्मण व शूद्र हे दोनच वर्ण आहेत.'[2] धर्मशास्त्राप्रमाणे ब्राह्मण व शूद्र हे दोनच वर्ण राहिल्याने ब्राह्मण वर्ग वगळता बाकी सगळे वर्ण शूद्र त्यामुळे त्यांचे धार्मिक विधी पुराणोक्त पद्धतीने केले पाहिजे असे धर्मशास्त्र सांगत होते. या सर्व प्रकरणास शाहू महाराजांनी विरोध केला.

**वेदोक्त प्रसंग –**

पंचगंगा नदीच्या काठावरती छत्रपती शाहू महाराजांच्या जीवनामध्ये वेदोक्त प्रकरण घडले. वेदोक्त प्रकरण काय आहे तर इ.स.1899 या कालखंडामध्ये कार्तिक मासांमध्ये राजा-रजवडयामधील रितिरीवाजाप्रमाणे छत्रपती शाहू महाराज, त्यांचे बंधू बापूसाहेब घाडगे महाराज, त्यांचे मामा मामासाहेब खानविलकर, त्यांचे स्नेही राजारामशास्त्री भागवत हे कार्तिक मासामध्ये सकाळच्या वेळेला नदीच्या काठावरती असणाऱ्या या घाटावरती येऊन स्नान करत. कार्तिक मासामध्ये सकाळच्या वेळेला ही मंडळी आंघोळीला आल्यानंतर नदीमध्ये उतरली. त्यावेळी तेथे असणारे मंत्र-उच्चार म्हणणारे नारायण भट हे आंघोळ न करताच नदीच्या काठी मंत्र उच्चार करण्यासाठी आलेले होते. आणि मग मंत्रौच्चार म्हणायला लागले आणि त्यांच्यामध्ये राजाराम शास्त्री भागवत हे विद्वान होते. वेदामध्ये ते पांडित्य होते. आणि मग वेद म्हणत असताना या राजाराम शास्त्री भागवत यांच्या असं लक्षात आले की नारायण भट हे वेदोक्त मंत्र म्हणण्याऐवजी पुराणोक्त मंत्र म्हणत आहेत. असे शाहू चरित्रकार आण्णासाहेब लठ्ठे व धंनजय किर यांनी म्हटले आहे.[3] राजाराम शास्त्री भागवत यांनी नारायण भट याला विचारले की भटजी तुम्ही महाराजांसाठी वेदोक्त मंत्र म्हणण्याऐवजी पुराणोक्त मंत्र का म्हणत आहात, तेव्हा नारायण भट यांनी असे उत्तर दिले की, महाराज हे क्षत्रिय नाहीत. आणि म्हणून महाराज क्षत्रिय नसल्यामुळे त्यांना वेदोक्त मंत्र म्हणण्याचा अधिकार नाही. आणि म्हणून आम्ही पुराणोक्त मंत्रच त्यांना म्हणत असतो. म्हणजे आतापर्यंत त्यांच्यासाठी मंत्र उच्चारले जात होते.ते वेदोक्तच आहेत असं महाराज समजायचे पण राजाराम शास्त्री भागवत यांनी महाराजांच्या हे लक्षात आणून दिले की, महाराज तुमचा असणारा हा सेवेकरी तुमच्यासाठी वेदोक्त मंत्र न म्हणता पुराणोक्त मंत्र म्हणत आहे. महाराजांनी याची चौकशी केली तेंव्हा त्यांच्या असं लक्षात आले की ह्यांनी आपल्यासाठी जे मंत्र म्हटले ते पुराणोक्त आहेत,आणि या प्रसंगातून महाराज असं म्हटले की, मी एवढा राजा असताना माझ्या जीवनात असे अपमानात्मक प्रसंग येत असतील तर या संस्थांनामधील लोकांच्या जीवनात कशाप्रकारे प्रसंग येत असतील आणि म्हणून हा क्षण, वेदोक्त प्रसंग हा 'महाराजांच्या जीवनाला कलाटणी देणारा' ठरला. या प्रसंगानंतर महाराजांनी 1901 साली वेदोक्त श्रावणी करून घेतली. यावेळी वेदोक्त श्रावणी करणारे कोण होते तर नारायण भट्ट (पूर्वी ते भट होते,हे दुसरे भट्ट आहेत.) तत्पूर्वी महाराजांनी आप्पासाहेब राजोपाध्ये यांना बोलावले होते. आप्पासाहेब राजोपाध्ये यांनी सुद्धा महाराजांची वैदिक पध्दतीने श्रावणी करण्यास स्पष्ट शब्दात नकार दिला. त्यांनी असे सांगितले की, महाराज हे क्षत्रिय नाहीत. आणि त्यांना वैदिक पद्धतीने मंत्र उच्चार करण्याचा अधिकार नाही.आता राजोपाध्यांचे वतन जप्त करण्यावाचून दूसरा पर्याय छत्रपतीसमोर नव्हता. तीस हजार उत्पन्न असणारे राजोपाध्यांचे वतन छत्रपतींनी जप्त करण्याचा हुकूम काढला. (मे 1902). त्यांना ब्रिटिश सत्तेकडे दाद मागण्याचा सल्ला लोकमान्यांनी दिला. ते ग.ज. लॉर्ड कर्झनकडे गेले. पण राजोपाध्यांचे इनाम हे चाकरी इनाम होते. जेव्हा चाकरी बंद,तेव्हा इनामही बंद अशी या प्रकरणाची कायदेशीर बाजू होती. याचा परिणाम असा झाला की छत्रपती शाहू महाराजांच्या जीवनाला एक कलाटणी मिळाली. आणि त्यानंतर महाराजांनी सुधारणांचा धडाका सुरू केला. यावेळी लोकमान्य टिळकांनी या प्रकरणात हस्तक्षेप केला. आणि त्यांनी नारायण भटची बाजू घेतली. आणि त्यामुळे समाजामध्ये ब्राह्मण आणि ब्राह्मणेत्तर असे सरळ दोन गट पडले. लोकमान्य टिळकांनी या प्रकरणात भाग घेतल्याने हे प्रकरण चिघळत गेले.

**शाहू महाराजांची भूमिका –**

**वसतिगृहाची स्थापना –**

हू महाराजांनी प्रत्येक जातीसाठी स्वतंत्र वसतिगृह स्थापन केले. वस्तीगृहाना लागणारी जागा, इमारत आणि अनुदान दिले जाई. कोल्हापुरात 1901 ते 1921 पर्यंत त्यांनी व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग (नंतर छ. शाहू मराठा बोर्डिंग), दिगंबर जैन बोर्डिंग, शीरशैव लिंगायत वसतिगृह, मुस्लिम बोर्डिंग,पांचाळ चांबार बोर्डिंग, नाभीक विद्यार्थी वसतिगृह, रजपूतवाडी बोर्डिंग, रुकडीचे बोर्डिंग इ. 23 वसतिगृहे स्थापन केली.[4] काहीही करून सर्व ब्राहमणेत्तर समजतील मुले शिकला हवीत हे उद्दीष्ट डोळयासमोर ठेऊन त्यांनी वसतिगृहे स्थापन केली.

**प्राथमिक शिक्षण सक्तीचे -**

शाहू महाराजांनी 8 सेप्टेंबर 1917 रोजी सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा जारी केला. दर वर्षी प्राथमिक शिक्षणासाठी एक लाख रुपये खर्च करण्याचे ठरले. देवस्थानच्या इमारती या सार्वजनिक ठरवून त्यांचा वापर शाळेशाठी करावा असा शाहू महाराजांनी हुकूम काढला. तसेच शाळेत न येणाऱ्या मुलांची व त्यांच्या पालकांची नावे मामलेदारास शाळेच्या हेडमास्तरांनी कळवावीत असा आदेश काढला. पालकांचे म्हणणे ऐकून घेऊन ते संयुक्तिक नसेल तर प्रत्येक महिन्याला एक रुपया दंड मुले शाळेत येईपर्यंत आकारला जाई.

आपल्या राज्यघटनेत मार्गदर्शक तत्वात 45 व्या कलमानुसार सक्तीचे व मोफत शिक्षणाची तरतूद 1950 साली केली. परंतु त्यासाठी 2010 ला कायदा केला.

**क्षात्रजगद्गुरूची निर्मिती –**

क्षात्रजगदगुरुची निर्मिती ही महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीच्या प्रतिक्रियेतील एक अभिनव कल्पना होती. त्यांनी ब्राह्मणी धर्मसत्तेला शह दिला. शाहू महाराजांनी सदाशिवराव पाटील बेनाडिकर या फर्ग्युसन कॉलेजमध्ये तत्वज्ञान व संकृतच्या विद्यार्थी असणाऱ्या तरूणास क्षात्रजगद्गुरू म्हणून नियुक्त केले. आणि कोल्हापूर संस्थांनातील सह्याद्रीच्या माथ्यावर असणाऱ्या पाटगावी शिवकाली मौनी महाराज नावाचे एक साधू पुरुष होऊन गेले. छत्रपती शिवाजी महाराजांचे ते गुरु होते. असे मानले जाते. त्याच मौनी महाराजांच्या पिठावर त्यांची क्षात्रजगद्गुरू म्हणून स्थापना केली. (12 ऑक्टोबर 1920)

**लोकमान्य टिळकांची भूमिका –**

**एक**,वेदोक्ताची मागणी हे एक खूळ आहे.

**दोन**,वेदोक्त मागणीमुळे जातीचा सामाजिक दर्जा ठरत नाही.

वेदोक्त प्रकरण हे टिळकांच्या जातीविषयक भूमिकेसंदर्भातील एक महत्वाची घडामोड आहे. टिळकांनी केसरीमध्ये 22 व 23 ऑक्टोबर 1901 च्या अंकात वेदोक्ताचे खूळ या शीर्षकाचे दोन मोठे अग्रलेख लिहिले. या मधील पहिल्या अग्रलेखात वेदोक्ताची मागणी हे एक खूळ आहे असे सांगत, 'छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाबतीत अधिकार जो दिला गेला तो त्यांच्या कर्तुत्वाकडे पाहून दिली गेलेली सवलत होय. सध्या ही मागणी करणारे शिवाजी महाराजांपेक्षा थोर नाहीत'.[5] ही मागणी योग्य नाही असे मत टिळकांनी व्यक्त केले.

दुसऱ्या अग्रलेखात 'वेदोक्त मंत्रामुळे एखाद्या जातीचा सामाजिक दर्जा वरचा ठरत नाही'.[6] असे मत त्यांनी मांडले. वेदोक्त पध्दतीने धार्मिक कार्य करण्यास नकार देणाऱ्या ब्राह्मण पुरोहिताचे इनामे जप्त करणे हे अन्याय्य आहे असे ही त्यांनी लिहिले.

**वेदोक्ताचे महाराष्ट्रावरील परिणाम –**

**एक**,ब्राह्मण-ब्राहमणेत्तर वादाची कायमची चौकट.

**दोन**,सत्यशोधक, ब्राह्मणेत्तर चळवळ गतिमान झाली.

**तीन**,राजकीय, सामाजिक, धार्मिक, जीवनात बदल झाले.

महाराष्ट्राच्या राजकरणाला ब्राह्मण-ब्राहमणेत्तर वादाची कायमची चौकट लोकमान्य टिळकांच्या भूमिकेमुळे मिळाली. वेदोक्त प्रकरणात टिळकांनी केवळ छत्रपती शाहू महाराजांचे क्षत्रियत्व मान्य करून व छत्रपती घराण्यातील इतरांचे क्षत्रियत्व अमान्य करून पेच आणखीनच वाढवला. ब्राह्मणेत्तर राजकारण आले कोठून तर लोकमान्य टिळकांच्या राजकीय आणि सामाजिक भूमिकेतून दिसते. कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज आणि वेदोक्त प्रकरण हा महाराष्ट्राच्या इतिहासाचा जसा अविभाज्य भाग आहे,तसा ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर दुफळी निर्माण होण्याचा तो एक अविभाज्य भाग आहे. महाराष्ट्रातल्या सर्व ब्रह्मवृंदाचा छ.शाहुंच्या क्षत्रिय असण्याला विरोध होता. आणि त्यामुळे शाहुंना वेदोक्ताचे संस्कार करणे शक्य नाही. अशी त्यांची भूमिका होती. या सगळया ब्राह्मण वर्गाला जो आधार मिळाला लोकमान्य टिळकांचा आधार मिळाला. टिळक होते तोपर्यंत टिळकांनी वेदोक्ताच्या प्रकरणामध्ये संपूर्णपणे ब्राह्मण वर्गाची बाजू उचलून धरली. आता छत्रपतीना क्षत्रिय म्हणता येत नसेल तर मग कोणाला म्हणायचे हाही पेच त्यामध्ये गृहीत होता. मग टिळकांनी त्यातल्या त्यात तोड अशी काढली की छत्रपती या व्यक्तिपुरत आम्ही मान्य करू त्यांच्या कुटुंबियांना आम्ही काही क्षत्रियत्व मान्य करणार नाही.या निमित्तणे जी एक घुसळण झाली. महाराष्ट्रामध्ये त्याच्यामधून ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वादाची बीजे रोवली गेली. हा ब्राह्मनेत्तर वादाचा उगम आहे. टिळक असताना टिळकांचे अनुयायी असणारे आणि टिळकांच्या मृत्यूनंतरही त्यांचे अनुयायी असणारे जे लोक आहेत त्या सगळयांनी ब्राह्मनांची वर्चस्वाची बाजू जोरदारपणे लावून धरलेली आहे. आणि जेव्हा-जेव्हा सामाजिक समतेचा प्रश्न निर्माण झाला, सामाजिक न्यायाचा प्रश्न निर्माण झाला, सामाजिक सुधारणांचा प्रश्न निर्माण झाला,त्या-त्या वेळेला यांनी सुधारणांना विरोध केलेला आहे. सामाजिक समतेला विरोध केलेला आहे. आणि धर्मशास्त्राचा आधार घेत बहुजनांना असणारे न्याय्य हक्क सुद्धा त्यांनी नाकारलेले आहेत. आणि एकंदर महाराष्ट्राच्या राजकीय जीवनावर

नाही तर सामाजिक, सांस्कृतिक जीवनावर त्यांचे वर्चस्व होते.

ब्रिटिश कालखंडाध्ये इंग्रजी शिक्षण सुरू झाले त्याचा सगळयात जास्त फायदा त्या काळामध्ये ब्राह्मण वर्गाला झालेला आहे. त्यामुळे प्रशासनामध्ये सहजपणे त्यांना नोकऱ्या मिळाल्या. आणि शिक्षणाच्या क्षेत्रातही त्यांची चलती सुरू झाली. म्हणजे एका बाजूने पाहिले तर शिक्षण, नोकऱ्या, प्रशासन हे जे आधुनिक समाजातील सगळयात महत्वाचे अंग आहे त्याच्यामध्ये ब्राह्मण वर्गाचे वर्चस्व अबाधित राहिले. फक्त त्यांना राजकीय गुलामगिरीची खंत होती आणि ती टिळकांचे नेतृत्व त्यांनी स्वीकारल्यामुळे पूर्ण झाली.टिळकांची अडचण अशी झालेली आहे की आपल्या अनुयायांना न दुखावता त्यांना राजकारण कारायचे असल्यामुळे त्यांना सर्व सामाजिक सुधरणांना विरोध करावा लागला.[7] त्यांच्या मनात सामाजिक सुधरणांना पाठींबा द्यायचा की नाही माहीत नाही पण विरोध मात्र त्यांना करावा लागला.

वेदोक्त प्रकरणानंतर महाराष्ट्रात सत्यशोधक व ब्राह्मणेत्तर चळवळ गतिमान झाली. महात्मा ज्योतिराव फुले यांनी 24 सेप्टेंबर 1873 रोजी पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती. शूद्र किंवा अतिशुद्रांची पुरोहितांकडून होणारी पिळवणूक बंद झाली पाहिजे असे सत्यशोधक समाजाचे ध्येयधोरण होते.'सत्यशोधक समाजाने ज्याप्रमाणे ब्राह्मण वर्चस्वाला आव्हान दिले त्याचप्रमाणे आपली ही जबाबदारी असली पाहिजे,असेच शाहूना वाटत होते. त्यामुळे ब्राह्मणांचे वर्चस्व संपुष्टात आणण्यासाठी शाहूना वेदोक्ताची गरज वाटत होती'.[8] छत्रपती शाहू महाराजांना वेदोक्त प्रकरणांतर भट-भिक्षुकांच्या प्रवृत्तीची जाणीव झाली होती. त्यामुळेच ते सत्यशोधक समाजाच्या विचारसरणीकडे आकर्षित झाले. 11 जानेवारी 1911 रोजी कोल्हापुरात महाराजांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाच्या कार्यालयासाठी महाराजांनी गंगावेशीतील जागा दिली. 1913 मध्ये कोल्हापुरात सत्यशोधक शाळा सुरू झाली. या शाळेत शिक्षण पूर्ण केलेल्या निरनिराळ्या जातीच्या पुरोहितांनी त्याचवर्षी कोल्हापुरात 1513 धार्मिक विधी केले, त्यात 226 विवाह विधी होते. या समाजाच्या प्रसारकांनी खेड्यापाड्यात जावून सत्यशोधक समाजाचा प्रसार केला. महाराजांच्या प्रोत्साहनामुळे सत्यशोधक समाजाला आलेली मरगळ दूर झाली.

महाराष्ट्राच्या इतिहासात ब्राह्मणेत्तर चळवळीचे स्पष्टीकरण 1917 च्या सुमारास झाले. बहुजन समाजाला सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक हक्क मिळवून देणे हे ब्राह्मणेत्तर चळवळीचे सूत्र होते. ब्राह्मण वर्गाकडून होत असलेल्या या जुलूम जबरदस्तीचा, छळवादाचा फार मोठा आघात राजर्षी शाहू महाराजांच्या मनावर झालेला असल्यामुळे ब्राह्मणेत्तर जातींना दिलासा मिळवून देण्यासाठी ब्राह्मणेत्तर चळवळीचा मार्ग निवडला. ब्राह्मणेत्तर चळवळ बळकट करण्यासाठी शाहू महाराजांनी शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले. यासाठी त्यांनी मोफत प्राथमिक शिक्षणाचा ठराव पास केला. विविध जाती-जमातीच्या विद्यार्थ्यासाठी वसतिगृहाची सोय करण्यात आली. प्रशासन सेवेत ब्राह्मणेत्तरांची भरती केली.

**समारोप -**

वेदोक्त प्रकरणामुळे महाराष्ट्रात आज कितीतरी बदल झालेले आहेत. धार्मिक अधिकार-स्वातंत्र्य ब्राह्मणेत्तरांना मिळू लागलेले आहेत. आज विवाह लावणे, विवाहात मंगलाष्टका म्हणणे,शाहू वैदिक विद्यालय मधून वैदिक शिक्षण घेऊन आज लष्करामध्ये पंडित म्हणून अनेकजन भारती झाले आहेत, कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिर असो,पंढरपूरचे विठ्ठल मंदिर असो किंवा प्रतापगडचे भवानी मंदिर असो,याठिकाणी पुरोहिताचे शिक्षण घेतले त्यांना नोकऱ्या मिळाल्या आहेत. फार मोठा उपक्रम शाहू महाराजांनी 100 वर्षापूर्वी सुरू केला होता,आणि धार्मिक रूढी,परंपरा राहणार,समाजाला धर्माची गरज असते. किमान त्या धार्मिक रूढी,परंपरा पाळण्याचा अधिकार प्रत्येकाला पाहिजे आणि त्यामुळे कोणीही पूरोहित होऊ शकते हे शाहू महाराजांनी त्यावेळी दाखवून दिले आणि त्यामुळे आज कोणीही पूरोहित होऊ शकते. आज देवळातील पुजारी ब्राह्मणेत्तर होऊ लागले. ज्याचा अभ्यास आहे ते कोणीही होऊ शकते. जन्मावर आधारित जो अधिकार होता तो आज नाही. यातून बऱ्याच लोकांचे परिवर्तन झाले. धार्मिक अधिकार सर्वांना आहे हे आज भारतीय घटनेने मान्य केलेले आहे. आज धार्मिक स्वातंत्र्य ब्राह्मणेत्तरांना मिळू लागले. परंतु आजूनही त्यांची पकड कमी झालेली नाही. रूढी,परंपरा आहेत. उच्च वर्णीयांचे श्रेष्ठत्व मान्य करणारे लोक आजही आहेत. त्यांची मानसिकता गेलेली नाही. सत्यनारायण पूजा, होम, गृहप्रवेश, नारायण नागबळीसारख्या विधी मधून अमाप पैसे घेऊन विधी केले जातात.तसेच पुणे येथील खोले प्रकरण अशी अनेक उदाहरणे देता येतील. वेदोक्त प्रकरणानंतर बदल झाले पण हे दिसतय. आज स्वातंत्र्यानंतर ही व्यवस्था बदलणारे राजकीय नेतृत्व मिळाले नाही. आजच्या आस्मितानिष्ठ राजकरणात याच्या निर्मूलनाची शक्यता मला दिसत नाही.

**निष्कर्ष -**

1) महाराष्ट्रातील राजकारण, समाजकारण ढवळून निघाले.
2) बहुजनांच्या चळवळीचे नेतृत्व शाहू महाराजांनी केले.
3) महाराष्ट्राच्या राजकरणाला ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वादाची कायमची चौकट मिळाली.
4) वेदोक्त प्रकरणात लोकमान्य टिळकांनी ब्राह्मण वर्गाची बाजू उचलून धरली.
5) वेदोक्त काळानंतर महाराष्ट्रातील सत्यशोधक, ब्राह्मणेत्तर चळवळ गतिमान झाली.

6) आजच्या काळात धार्मिक विधी ब्राह्मण वर्गांकडून केले जात असले तरी काही ब्राह्मणेत्तर लोकांकडून धार्मिक विधी होत आहेत.

**संदर्भ ग्रंथ सूची –**


1) पवार जयसिंग, (2017),राजर्षी शाहू छत्रपती, जीवन व कार्य, ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, पृ.37.
2) फडके य. दि., (1986),शाहू छत्रपती आणि लोकमान्य, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, पृ. 49.
3) किर धनंजय,(1979), राजर्षी शाहू छत्रपती,पृ. 82.
4) जत्राटकर आलोक,(2022),शाहू महाराज व ब्राहमणेत्तर चळवळ, समाज प्रभोधन पत्रिका ,कोल्हापूर,पृ. 65.
5) समग्र टिळक, (1976), खंड 5, समाज व संस्कृती, केसरी प्रकाशन,पुणे,पृ.150.
6) दातार अभय,(2021),लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांची जातिप्रश्नविषयक भूमिका: काही निरीक्षणे,समाज प्रभोधन पत्रिका ,कोल्हापूर,पृ.27.
7) बेडकीहाळ किशोर,(2021),ब्राहमणेत्तरांचे राजकारण, केशवराव जेधे व्याख्यानमाला.
8) पाटील भारती,(2022),वेदोक्ताचे वादळ: समजक्रांतीचे बीजारोपपण,समाज प्रबोधन पत्रिका ,कोल्हापूर,पृ. 26.